नियमीत फौजदारी खटला क्र. **१२३/२०२५**
निशाणी क्र. **११/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रमोद शिवराम राऊत** |
| वय सुमारे | : | ५१ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय |
| निवासस्थान | : | मु. पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. माझे वडापाव चहाचे छोटेसे हॉटेल आहे. माझे शिक्षण आठवी आहे. दि. २२/१२ रोजी दोन वर्षापूर्वी घटना घडली होती. अंदाजे रात्री ८:३० ते ९:०० वाजताच्या दरम्यान घटना घडली होती. मी घरी होतो कोणीतरी दरवाजा ठोकला. मी दरवाजा उघडला असता सचिन मनोहर राणे याने दांडक्यांनी माझ्या दोन्ही हातावर फटके मारले. त्यावेळी माझ्या घरी माझी आई, पत्नी, छोटी मुलगी होती. त्याने माझ्या बायकोला केस ओढून बाहेर ओढले. मलाही त्यांनी ओढले व पाडले. सिद्धी सचिन राणे यांनी माझ्या बायकोच्या पाठीवर हाताने मारले होते. माझी पत्नी एक दिवस सिव्हील हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होती. आम्ही स्वत: सिव्हील हॉस्पीटलमध्ये गेलो होतो. दोन दिवसांनी पोलीसांनी माझी तक्रार नोंदवली होती.

०२. मला दोन्ही हातावर मार लागला होता. माझ्या उजव्या हाताच्या खांद्याला जबर मार लागला होता. त्यामुळे ऑपरेशन करावे लागले होते व माझ्या पायाचे हाड काढून खांद्याला जोडले होते व माझ्या हाताला ऑपरेशन करुन पट्टी बसवलेली आहे. मी अलिबाग सिव्हील हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल होतो

पोलीसांनी तेथेच येवून माझी तक्रार नोंदवली होती. तक्रार दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवलेली तक्रार तिच आहे. तक्रारीतील मजकूर खरा असून त्यावर माझा अंगठा आहे. माझ्या दोन्ही हाताला मार लागला असल्याने पोलीसांनी माझा अंगठा घेतला होता. तक्रार **निशाणी क्र. पी—१** म्हणजेच **निशाणी क्र. १२** वर आहे. ज्या काठीने मला मारहाण केली ती काठी मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला बांबूची काठी दाखवण्यात आली याच काठीने मला मारहाण करण्यात आली होती. काठीस **मटेरिअल ऑब्जेक्ट—१** देण्यात आले. आरोपी आज कोर्टात हजर आहे. मी त्यांना ओळखतो.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचेही चहा नाश्त्याचे नागांव बिच येथे दुकान आहे. यापूर्वी मी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दिली नव्हती. माझ्या घराच्या समोर विकास पिंपळे यांचे घर आहे. उदय राऊळ हा माझ्या काकाचा मुलगा आहे. माझ्या भावाचे नाव विनोद राऊळ आहे तो आमच्या घराच्या वरच्या मजल्यावर राहतो. माझ्या घराच्या समोर ओटा आहे. आरोपीचे घर रस्त्याच्या पलीकडे आहे. माझ्या घरापासून त्याचे घर लांब आहे. पोलीसांनी फिर्याद दि. २५/१२/२०२४ रोजी दाखल केली आहे. माझी पत्नी व भाऊ रोज हॉस्पीटलमध्ये येत—जात होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे एक बाई कामाला होती व आम्ही तिला काढून टाकली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती बाई नंतर आरोपीकडे कामाला जात होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे व आमचे बिचवरील दुकान जवळजवळ आहे. माझ्याकडे दोन कामगार होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडील बाई त्यांच्याकडे कामाला गेल्यामुळे मी

आरोपीवर नाराज होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये जे गैरसमज झाले होते ते कामावरील बाईमुळे झाले होते. माझ्या लक्षात नाही की, पोलीसांनी माझी फिर्याद घेतली त्यावेळेस माझी पत्नी व भाऊ तेथे हजर होते. मी शरद राणे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेआगोदर माझ्यात व शरद राणे यांच्यात वादविवाद झाला होता. शरद राणे हा आरोपीचा काका आहे तो आरोपीच्या बाजूलाच राहतो. शरद सोबत वाद झाला त्यावेळेस त्याच्या घरी मी व माझी पत्नी आम्ही गेलो होतो.

०४. मी पोलीसांना सांगितले होते की, कोणीतरी दरवाजा ठोठावला होता. सदरची बाब माझ्या फिर्यादीत का लिहीली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपीने दोन्ही हातावर दोन–दोन फटके मारले होते. मी डॉक्टरांना दोन्ही हात दाखवले होते. मी पोलीसांना सांगितले होते मी, मला ओढले होते व खाली पाडले होते. तसे पोलिसांनी माझ्या फिर्यादीत का लिहीले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. सिद्धीने माझ्या पत्नीच्या पाठीवर मारहाण केली हे मी फिर्याद देतेवेळी सांगितले होते. तसे पोलीसांनी माझ्या फिर्यादीत का लिहीले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांनी पुन्हा माझा जबाब घेतला नव्हता. माझे ऑपरेशन झाले होते माझ्या पायाचे हाड खांद्याला बसवून पट्टी लावली होती हे आज मी पहिल्यांदाच सांगत आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की, माझे ऑपरेशन झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. माझ्या अंगणाला गेट नाही. तेथे कोणीही येवू शकतो. मी काठीचे वर्णन पोलीसांना दिले नव्हते. आरोपी जाताना काठी घेवून गेला होता. हे

म्हणणे खरे नाही की, शरदचा व माझा वाद झाला होता त्यावेळेस आरोपीने माझ्या विरुद्ध कम्प्लेंट देतो असे सांगितल्याने मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, विलंबाने खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मटेरिअल ऑबजेक्ट–१ ने मारहाण झाली होती.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०९/०३/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२३/२०२५**
निशाणी क्र. **१४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **गणेश विनायक पाटील** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : ड्रायव्हींग |
| निवासस्थान | : | मु. बहीरी आळी, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २५/१२/२०२४ रोजी काय झाले ते मला माहीत नाही. मी कामावरुन आलो होतो. माझ्या समक्ष पोलीसांनी पंचनामा केला नाही. पोलीसांनी माझी कोऱ्या कागदावर सही घेतली होती. आता मला दाखवण्यात आलेल्या घटनास्थळाच्या पंचनाम्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. सहीला **निशाणी क्र. १५** देण्यात येते.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

**<u>उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे बहीरीची आळी, नागाव येथील वृषाली राऊळ यांच्या घरासमोर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी लाकडी दांडका जप्त केला होता.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०६/०४/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.